ePaper
वर्ष - 7 । अंक - 125 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 7 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मराठा आंदोलनाचा फटका; तीन दिवसात STचे 15 कोटींचे नुकसान



## आतील पानांत


- मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र!
- अफगाणची झुंज व्यर्थ!
- ही बाई काहीही करु शकते
- नवीन संसदेचा श्रीगणेशा!


# वीज समस्यामुक्त चिंचवडचा संकल्प!

## » स्वतंत्र वीज उपकेंद्राची उभारण्याची मागणी : शंकर जगताप यांचा पाठपुरावा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**चिंचवड विधानसभा मतदार संघात भेडसावणारी वीज समस्या कायमस्वरुपी सोडवण्यासाठी स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली आहे.**

याबाबत महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत आहे. शहराच्या उपनगर भागात मोठ्या प्रमाणात नवीन व मोठे-मोठे गृहप्रकल्प, औद्योगिक वसाहती, आयटी कंपन्या उभ्या राहत आहेत. यामुळे या भागात विजेची मागणी मोठ्याप्रमाणात वाढली आहे.

सध्यस्थितीला वाकड, ताथवडे, पुनावळे या भागांमध्ये नवीन गृहप्रकल्प विकसित होत आहेत. यामुळे घरगुती जोडणी, व्यवसायिक जोडणी अशा अनेक नवीन ग्राहकांची संख्या वाढली आहे.

मात्र, केवळ बिजलीनगर व रहाटणी या दोन ठिकाणी जीव उपकेंद्र आहेत. या दोन उपकेंद्रांवर संपूर्ण चिंचवड विधानसभा मतदार संघाचा वीजपुरवठा अवलंबून आहे. परिणामी, वीज पुरवठा यंत्रणेवर मोठा ताण येत असून, वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे.

वाढती लोकसंख्या आणि वीजेची मागणी याचा विचार करुन महावितरण प्रशासनाने तात्काळ स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारावे, अशी आग्रही मागणीही शंकर जगताप यांनी केली आहे.






“ चिंचवड विधानसभा मतदार संघातील वीज ग्राहकांची संख्या वाढलेली आहे. नवीन गृहप्रकल्प, व्यावसायिक वीज ग्राहक मोठ्या संख्येने असल्यामुळे वीज समस्या आणि तक्रारींमध्ये कमालीची वाढ झाली आहे. वाढत्या मागणीनुसार, वीज पुरवठा यंत्रणा पायाभूत सुविधा विकसित करणे अनिवार्य आहे. त्यामुळे नवीन वीज उपकेंद्र उभारल्यास वीज पुरवठा सुनियोजित होईल. याबाबत महावितरण प्रशासनाला आग्रही मागणी केली आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**- शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# आता गुन्हेगारी आटोक्यात येणार, पोलिसांवरील ताण कमी होणार!

## » पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी तिसऱ्या परिमंडळाची निर्मिती

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पोलीस आयुक्तालयाअंतर्गत गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी तसेच पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी आता आणखी एका परिमंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागाने आणखी एक परिमंडळ आणि चार अतिरिक्त विभागांना सोमवारी मान्यता दिली. त्यानुसार, परिमंडळ उपायुक्त तसेच विभागीय सहायक पोलीस आयुक्त यांच्या कार्यक्षेत्राची पुन:र्रचना निश्चित करण्यात आली असून परिमंडळ तीनच्या पोलीस उपायुक्तपदी संदीप डोईफोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

शहरासाठी १५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर दोन परिमंडळ निर्माण करण्यात आले. सध्या उपायुक्त विवेक पाटील आणि डॉ. काकासाहेब डोळे यांच्याकडे परिमंडळ एक आणि दोनची जबाबदारी आहे. तर, स्वप्ना गोरे यांच्याकडे गुन्हे शाखेसह मुख्यालय, प्रशासनाची जबाबदारी आहे. संदीप डोईफोडे आणि शिवाजी पवार या दोघांची नव्याने पोलीस उपायुक्त म्हणून पिंपरी - चिंचवड शहरात १८ ऑगस्ट रोजी बदली झाली. मात्र, त्यांच्याकडे कोणताच पदभार देण्यात आला नव्हता. सन २०१८ मध्ये पिंपरी - चिंचवड आयुक्तालयाची निर्मिती करताना शासनाने आयुक्तालयाकरीता दोन परिमंडळे आणि ४ विभागांना मान्यता दिली होती. परंतु, वाढती लोकसंख्या, नागरिकरण, औद्योगिकीकरण, शैक्षणिक संस्था, वाहतूक, वाहनांची वाढती संख्या तसेच कायदा - सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टिकोनातून पोलीस आयुक्तालयाची विभागवार पुनर्रचना होणे गरजेचे होते. ही गरज लक्षात घेऊन पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आणखी १ परिमंडळ व २ अतिरिक्त विभाग वाढवून मिळावा, यासाठी १७ मे २०२३ रोजी शासनास प्रस्ताव पाठविला होता.

त्यानुसार, राज्याच्या गृह विभागाने ४ सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्तालयाकरीता आणखी एक परिमंडळ व चार अतिरिक्त विभागांना मान्यता दिली आहे.




### परिमंडळ कार्यक्षेत्रांची पोलीस ठाणेनिहाय पुनर्रचना

» परिमंडळ – एक : सहायक पोलीस आयुक्त (पिंपरी) – पिंपरी, भोसरी
सहायक पोलीस आयुक्त (चिंचवड) – चिंचवड, निगडी, सांगवी

» परिमंडळ – दोन : सहायक पोलीस आयुक्त (देहुरोड) – तळेगाव-एमआयडीसी, तळेगाव-दाभाडे, देहुरोड, शिरगाव-परंदवाडी
सहायक पोलीस आयुक्त (वाकड) – रावेत, वाकड, हिंजवडी

» परिमंडळ – तीन : सहायक पोलीस आयुक्त (चाकण) – चाकण, म्हाळूंगे-एमआयडीसी, आळंदी
सहायक पोलीस आयुक्त (भोसरी-एमआयडीसी) – दिघी, भोसरी-एमआयडीसी, चिखली

# राज्यातील शाळांमध्ये परसबाग निर्मितीला प्रोत्साहनासाठी स्पर्धा!

## गेल्यावर्षीच्या 22 हजार 973 परसबागांची निर्मिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत राज्यातील शाळांमध्ये परसबागा निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य पातळीवर होणार असून, गेल्यावर्षीच्या स्पर्धेतून सुमारे २२ हजार ९७३ परसबागांची निर्मिती झाली आहे.**

राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ दिला जातो. केंद्र सरकारच्या २०१९मधील निर्देशानुसार विद्यार्थ्यांनी परसबागेत पिकवलेला भाजीपाला, फळे यांचा समावेश शालेय पोषण आहारात केला जातो. परसबाग निर्मितीमुळे विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण होवून त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळणे, ताज्या भाजीपाल्याचा समावेश पोषण आहारात होवून विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार उपलब्ध होण्याचे हेतू या उपक्रमातून साध्य होतात. शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये राज्यातील शाळांमध्ये परसबागा निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी स्पर्धा आयोजित करून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि तीन शाळांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यासाठी तालुकास्तरावर एकूण १३ हजार रुपये, जिल्हा स्तरावर २८ हजार रुपये, राज्यस्तरावर १ लाख ३६ हजार रुपये पारितोषिकांसाठी दिले जाणार आहेत. परसबाग उपक्रमासाठी शाळांना नजीकचे कृषि विज्ञान केंद्र, कृषि शाळा, कृषि विभागातील कृषि सहायक, पर्यवेक्षक, कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संस्थाम, सेंद्रीय शेती करणारे पालक, शेतकरी, कृषि तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य घेता येणार आहे. स्पर्धेचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षण, आहारतज्ज्ञ, कृषी, आरोग्य, अन्न आणि औषध प्रशासन विभागातील अधिकारी, स्थानिक प्रगतीशील शेतकरी यांची समिति नियुक्ती करायची आहे.



### शाळांना प्रोत्साहनपर पारितोषिक

परसबाग निर्मितीमुळे विद्यार्थ्यांची निसर्गाशी जवळीक निर्माण होवून त्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळणे, ताज्या भाजीपाल्याचा समावेश पोषण आहारात होवून विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार उपलब्ध होण्याचे हेतू या उपक्रमातून साध्य होतात. शैक्षणिक वर्ष २०२३-२४मध्ये राज्यातील शाळांमध्ये परसबागा निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी स्पर्धा आयोजित करून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि तीन शाळांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात येणार आहे. त्यासाठी तालुकास्तरावर एकूण १३ हजार रुपये, जिल्हा स्तरावर २८ हजार रुपये, राज्यस्तरावर १ लाख ३६ हजार रुपये पारितोषिकांसाठी दिले जाणार आहेत.

# मंगळागौरी... ही मराठी संस्कृतीची ओळख!

## पौर्णिमा मोढवे-पाटील : ढेपे वाडा येथे रंगला मंगळागौरी खेळ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंदू धर्मातील प्रथेनुसार पवित्र श्रावण महिन्यामध्ये आयेजित केली जाणारी मंगळागौर पूजा ही मराठी संस्कृतीची ओळख आहे. भगवान शंकर आणि देवी पार्वती यांची पूजा अर्चना आणि विविध पारंपरिख खेळ यामुळे आपली संस्कृती टिकून आहे, अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्या पौर्णिमा दीपक मोढवे-पाटील यांचयासह महिलांनी व्यक्त केली.**



श्रावण महिन्यानिमित्त सामाजिक कार्यकर्त्या पौर्णिमा मोढवे-पाटील यांच्या पुढाकाराने ढेपे वाडा गिरीवन येथे चिंचवड-उद्योगनगर येथील क्वीन्स टाउन येथील महिलांसाठी मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शितल लड्ढा, प्रिती ओझा, प्रिती देशमुख, , प्रियांका जाधव, राजश्री सोनवणे, पल्लवी कोतकर, वानी तेलंग, शिल्पा खाडे, अनघा काळे, बिजल शाह आदी महिला उपस्थित होत्या. मंगळागौरी कार्यक्रमानंतर महाराष्ट्रीय भोजनाचा आस्वाद महिलांनी घेतला. पौर्णिमा मोढवे-पाटील म्हणाल्या की, पती-पत्नीमधील आत्यंतिक प्रेम व निष्ठेचा आदर्श म्हणून शिव-पार्वती या दांपत्याकडे पाहिले जाते. मंगळागौरीच्या व्रतामध्ये शिव-पार्वतीची पूजा केली जाते. मंगळागौरीचे व्रत व्यक्तिगत असले तरी पूजा मात्र सामूहिक केली जाते.

पारंपरिक वेशात आम्ही ही पूजा केली. तसेच, फुगडी, झिम्मा, तळ्यात-मळ्यात, खुर्ची का मिर्ची, नाच गं घुमा, आटुंश पान, तिखट मीठ मसाला, तांदूळ सडू बाई, कीस बाई कीस.. दोडका कीस, आगोटं-पागोटं असे पारंपरिक खेळांचा आम्ही आनंद घेतला. प्रत्येक खेळाला लयबद्धता आहे व त्यासोबतची गाणी ही स्त्रीभावनांचे, तिच्या कौटुंबिक सुखदु:खांचे हे प्रतिबिंब आहे. ही संस्कृती आपण टिकवली पाहिजे.

# मंडळांसाठी यंदा “मोरया पुरस्कार”!

## महापालिका प्रशासनाची तयारी : एक खिडकी योजनेद्वारे विविध परवाने

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गणेश मंडळांना लागणारा परवाना विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये एक खिडकी योजनेच्या माध्यमातून एकाच ठिकाणी होणार उपलब्ध होईल तसेच या वर्षापासून मोरया पुरस्काराने गणेश मंडळांना सन्मानित करण्यात येणार असल्याचे पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितले.**




पिंपरी चिंचवड शहरात साजरा होणाऱ्या यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने आणि शहरातील विविध गणेशोत्सव मंडळे तसेच पोलीस प्रशासन, वीज वितरण तसेच महापालिका अधिकारी यांची संयुक्त बैठक ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. शहरातील सर्व गणेश मंडळांनी स्वयंसेवकांची नेमणूक करून त्यांची यादी पोलीस प्रशासनास जमा करावी,पोलीस प्रशासनाकडून त्यांना तात्पुरत्या स्वरूपात ओळखपत्र देण्यात येईल तसेच या स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण शिबीराचे आयोजनही करण्यात येईल, असे पिंपरी चिंचवड शहराचे पोलीस आयुक्त चौबे म्हणाले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, उल्हास जगताप, प्रभारी शहर अभियंता ज्ञानदेव झुंजारे, सहशहर अभियंता संजय कुलकर्णी, बाबासाहेब गलबले, उपायुक्त मिनिनाथ दंडवते, रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, अण्णा बोदडे, किरणकुमार मोरे, राजेश आगळे, उमेश ढाकणे, शितल वाकडे, सीताराम भवरे यांसह शहरातील गणेश मंडळांचे प्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि नागरिक उपस्थित होते. वीजवितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर म्हणाले, कोणताही अपघात होऊ नये यासाठी शहरातील विसर्जन घाट मार्गावरील वीजेच्या तारांची उंची वाढवून घेण्यात येत असून तार सर्वेक्षण सुरू आहे. गणेश मंडळांना वापरण्यासाठी वीजेची सोय करण्यात येणार आहे आणि घरगुती दरानेच त्यांना वीज पुरविण्यात येणार आहे. तरी वीजेचा वापर करताना कोणताही अपघात होणार नाही याची काळजी सर्व गणेश मंडळांनी घ्यावी तसेच मंडळांना कोणतीही माहिती हवी असल्यास ग्राहक सुविधा केंद्रात किंवा शाखा केंद्रात भेट देऊन वीज दराबाबतचे अवतरण कार्यालयात उपलब्ध आहे..

यावेळी बैठकीस उपस्थित सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी तसेच गणेश मंडळांनी आपल्या सूचना पोलीस आयुक्त तसेच महापालिका अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले तर आभार पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी मानले.

### कोणालाही त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी...

» पोलीस आयुक्त चौबे म्हणाले, सार्वजनिक गणेश मंडळांना लागणारा परवाना हा विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये एक खिडकी योजनेच्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच ही सुविधा सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे. गणेश मंडळांना परवानगी देताना शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही मात्र पोलीस प्रशासन, महापालिका तसेच इतर यंत्रणांनी निश्चित केलेल्या अटी शर्तींचे पालन करणे संबंधित मंडळांना बंधनकारक असणार आहे. पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरी आहे. या शहराचे एक वैशिष्ट्य आहे की, येथील सर्व नागरिक एकत्रित सण साजरे करतात आणि हा एकोपा आपल्याला कायम ठेवायचा आहे. गणेश मंडळांनी साऊंड सिस्टीम लावताना विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक किंवा इतरांचा विचार करावा. साऊंड सिस्टीमच्या आवाजाने कोणालाही त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी, असे निर्देशही चौबे यांनी यावेळी दिले.

### विसर्जन घाटांची यादी लवकरच प्रसिद्ध करणार...

» महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, शहरातील गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिरवणुकींचे मार्ग तसेच सार्वजनिक विसर्जन घाट सुव्यवस्थित करण्याबाबत सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच त्या ठिकाणी महावितरणाच्या वतीने विद्युत व्यवस्थाही करण्यात येणार आहे. या वर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणपुरक वातावरणात पार पडावा यासाठी शहरातील सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमींची बैठकही घेण्यात आली आहे. गणेश मंडळांनीही यासाठी सहकार्य करणे गरजेचे असून झाडांवर खिळे ठोकणे, पोस्टर लावणे, फांद्या तोडणे हे शक्यतो टाळावे, अशा सूचना अतिरीक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी दिल्या तसेच महापालिका आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने विसर्जन घाटांची पाहणी करून निश्चित करण्यात येणार असून विसर्जन घाटांची यादी नागरिकांसाठी लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

---

# संघर्षामध्ये जो टिकून राहिल तो समृद्ध होईल!

## विनायक भोंगाळे यांच्या भावना : गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कर्तव्यनिष्ठ व्यक्तीला संस्थेने न्याय दिला पाहिजे. संघर्षामध्ये जो टिकून राहिल तो समृद्ध होईल. शिक्षक दिन एका दिवसापुरता मार्यादित न राहता ती संस्कृती बनली पाहिजे. कोणते काम करावे आणि न करावे, हे आपल्या हातात आहे. केवळ वेळ जात नाही म्हणून शिक्षक होवू नका. ते राष्ट्राचे आणि घराचे पर्यायाने स्वत:चे व संस्थेचे नुकसान करणारे आहे, अशा भावना स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक- अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी व्यक्त केल्या.**





देशाचे माजी राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या गायत्री इंग्लीश मीडियम स्कूलमध्ये हा कार्यक्रम उत्साहात झाला.यावेळी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक कविता कडू व विश्वस्त सरिता विखे यांनी सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले व कार्यक्रमात उस्फुर्त सहभाग घेतला. सर्व विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच, मनोरंजनच्या कार्यक्रमात सहभागी झाले. कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शन व नियोजन कार्य एसएससी विभागाचे उपमुख्याध्यापक बाळकृष्ण गोसावी व त्यांच्या टीमने केले.

### शिक्षकांचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत...

» अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात शिक्षक दिनाचा हा कार्यक्रम संपन्न झाला. शिक्षक दिनाच्या दिवशी एक वेगळा अनुभव विद्यार्थ्यांना दिला जातो. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील त्यांच्यापेक्षा लहान असलेल्या पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांची सर्व कामे वाटून घेतली. एवढेच नव्हे, तर शिक्षकाच्या भूमिका काही विद्यार्थ्यांनी पार पाडल्या. विद्यार्थ्यांसाठी हा एक वेगळा अनुभव होता. सर्व शिक्षकांच्या सन्मानार्थ ढोल-ताशाच्या गजरात शाळेत फुलांची उधळन करीत त्यांचे स्वागत करण्यात आले. मुलांनी वर्गात आपल्या शिक्षकांना ओवाळून त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त केला.

# पर्यावरण- दुर्लक्षाची कबुली..




**निर्णय घाईघाईत घ्यायचे, त्यांचे श्रेय घेण्यासाठी गाजावाजाही करायचा, मात्र हे निर्णय अंगलट येऊ लागले आणि त्यामुळे होणारे नुकसान सर्वांना दिसू लागले की आपण नामानिराळे व्हायचे, ही सरकारी कामाची शैली. तिच्यापायी सामान्यजनांना रांगा लावाव्या लागतात तेव्हा 'सीमेवरचे जवान पाहा, २४ तास उभे असतात' वगैरे सांगून सर्वसहमती मिळवता तरी येते.**

पण या अशा शैलीपायी पर्वत ढासळू लागले, डोंगराळ भागातील शहरांमध्ये वस्त्या खचू लागल्या, वारंवार पूर येऊ लागले आणि 'सर्व ऋतूंत सुरू राहणारे' म्हणून उभारलेले बारमाही महामार्गसुद्धा कोलमडून पडू लागले, तर मात्र निर्णय योग्यरीत्या झाले होते की नव्हते याची चर्चा सत्ताधाऱ्यांवर शेकू शकते. ती शेकू लागल्यावर सरकार कोणत्या थराला जाऊ शकते, याचा उत्तम नमुना परवाच केंद्रीय पर्यावरण विभागाने सर्वोच्च न्यायालयाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून उघड झाला आहे. म्हणून त्याची चर्चा आवश्यक. त्याआधी हे नमूद केले पाहिजे की, हिमालयात असे उत्पात आधी घडलेच नव्हते असे नाही. पण त्या वेळी किमान, बारमाही महामार्ग बांधण्याचा अट्टहास तरी नव्हता. त्या हट्टापायी गेल्या जानेवारीत जोशीमठ ऊर्फ ज्योतिर्मठ खचले तसेच कर्णप्रयाग, मसुरी येथील लांडोर बाजारपेठ आदी ठिकाणीही



भूस्खलन होऊ लागले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात अशोक कुमार राघव या याचिकादाराने सर्वच हिमालयीन राज्यांतील जलदगती महामार्ग, जलविद्युत प्रकल्प, सुसाट जाणारी रेल्वे या प्रकारचा विकास थांबवावा- असा विकास या राज्यांना झेपणार आहे का हे तरी आधी तपासून पाहावे, अशी याचिका केली. हिमालयीन राज्ये म्हणजे लडाख आणि जम्मू-काश्मीर ते अगदी मिझोरम आणि सिक्कीमपर्यंतची १३ राज्ये. त्या सर्व राज्यांना सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली, पण या नोटिशीला कुणीही अपेक्षित मुदतीत प्रतिसादच दिला नाही, पुढल्या तारखाही न्यायालयीन सुटीनंतरच्या मिळाल्या. हे प्रकरण मागे पडले असे वाटते तोच जुलैमध्ये पुन्हा हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या दोन राज्यांना वादळी पावसाने तडाखा दिला. उत्तराखंडमध्ये भूस्खलनामुळे, तर हिमाचल प्रदेशात पुरामुळे पुन्हा हाहाकार माजला. त्यानंतरच्या सुनावणीत मात्र सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी 'हिमालयीन टापूची क्षमता नेमका किती भार सोसण्याची आहे, याचे तज्ज्ञांकरवी मूल्यमापन सर्व संबंधित राज्यांत होणार की नाही' अशा अर्थाची नापसंती व्यक्त केली होती. त्यामुळे अखेर केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाला प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करावी लागली. या प्रतिज्ञापत्रात, 'सर्व १३ हिमालयीन राज्यांतील भौगोलिक रचनेची क्षमता मोजण्यासाठी विविध विषयांच्या तज्ज्ञांची समिती, तीही 'गोविंदवल्लभ पंत हिमालय पर्यावरण व विकास संस्थे'च्या देखरेखीखाली स्थापण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहेच, पण १३ हिमालयीन राज्यांना या समितीच्या कामकाजात सहभागी करून घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने लक्ष घालावे, अशी गळही केंद्राने घातली आहे! अल्मोडा इथली गोविंदवल्लभ पंत संस्था ही १९८८ पासून कार्यरत आहेच, तिच्याच शास्त्रज्ञ, संशोधकांचे अभ्यास/ अहवाल पायदळी तुडवून तर आजवरचा 'विकास' झाला, हा आपला इतिहास आहे. शिवाय उत्तराखंडच्या 'देवभूमी'मध्ये भक्तांचे पर्यटन सुकर होण्यासाठी चारपदरी, बारमाही वगैरे महामार्गाचा जो राक्षसी घाट घातला गेला तेव्हाही पर्यावरण अभ्यासांकडे दुर्लक्ष झाले असल्याचेच पुढल्या काळात हे महामार्ग खचल्यामुळे सिद्ध झालेले आहे. पर्यटन- मग ते देवदर्शनासाठी असो की मौजमजेसाठी- त्यासाठीची दळणवळण साधने किती प्रमाणात उभारायची याला काही ताळतंत्र असले पाहिजे, ते हिमाचल प्रदेशातही सोडले गेले. मग या राज्यातले तब्बल ४०० रस्ते, गेल्या जुलैमध्ये झालेल्या पावसामुळे धुपले. ईशान्येकडील राज्ये आणि लडाख आदी प्रदेशांत तर आजवर कोणत्याच सरकारने दिल्या नसतील अशा वाहतूक सुविधा आम्ही दिल्या, हे श्रेय सध्याच्या सरकारने वारंवार घेतलेले आहे. महत्त्वाचे म्हणजे हिमाचल प्रदेश व दार्जिलिंग वगैरे पर्वतीय टापू येणारा पश्चिम बंगाल वगळता उर्वरित ११ राज्ये वा केंद्रशासित प्रदेश हे या ना त्या प्रकारे केंद्रातील सत्ताधारी पक्षाच्याच ताब्यात किंवा अखत्यारीत. 'डबल इंजिनां'चा प्रभाव या राज्यांत नाही म्हणावे तर मुंबईत येऊन काश्मीरच्या भरभराटीबद्दल मुलाखती देणारे तेथील नायब राज्यपाल ते 'मणिपुरात शांतता नांदेल' असा सूर केंद्रीय नेत्यांच्या सुरात मिसळणारे तेथील मुख्यमंत्री असा पट्टाच दिसतो.

## संपादकीय »

### यांचे तरी ऐका!

***मणिपुरात कुकी आणि मैतेई यांतील संघर्ष नव्याने सांगण्याची गरज नाही. या दोन जमातींमधील मतभेदाचे रूपांतर वणव्यात कसे झाले हेदेखील पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही.***

मणिपुरात कुकी आणि मैतेई यांतील संघर्ष नव्याने सांगण्याची गरज नाही. या दोन जमातींमधील मतभेदाचे रूपांतर वणव्यात कसे झाले हेदेखील पुन्हा सांगण्याची आवश्यकता नाही. या संघर्षांतून सुमारे २०० बळी गेले आणि ते राज्य उभे दुभंगल्याचेही देशाने पाहिले. त्याहीपेक्षा त्या राज्याचे मुख्यमंत्री बीरेन सिंह हे या काळात निष्क्रियतेचा महामेरू म्हणून कसे देशासमोर आले आणि त्यांच्या रूपाने अकार्यक्षमतेचा नवा मापदंड कसा तयार झाला, हेही देशाने अनुभवले. हे सिंह सध्या केंद्रीय सत्ताधारी भाजपचे निवासी आहेत. त्या पक्षाच्या राष्ट्रीय धोबीघाटावर सचैल स्नान केल्यास सर्व पापे धुतली जात असल्याने सिंह यांच्याविषयी कोणी काही बोलण्यास तयार नाही. उलट मणिपूरचे मुख्यमंत्री त्या राज्यात शांतता प्रस्थापित करण्यास केंद्रास कसे साहाय्य करतात याचेच गुणगान मध्यंतरी गायले गेले. हे सिंह महाशय मैतेई समाजाचे.

**लोकसभेची निवडणूक आठ महिन्यांवर आलेली आहे. तत्पूर्वी काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकाही होणार आहेत. अशा वेळी गेली सव्वा नऊ वर्षे सत्तेवर असलेल्या केंद्र सरकारला 'एक देश, एक निवडणूक' या संकल्पनेचे पिल्लू सोडावे लागले. त्यासाठी माजी राष्ट्पती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली.त्या भोवतींची चर्चा सुरू करावी लागते.**

# निवडणूक सुधारणा महत्त्वाच्या..!

जनतेच्या जीवनमरणाच्या मूलभूत प्रश्नांच्या ऐवजी लोकमत दुसऱ्याच विषयांकडे भरकटत नेण्याचा हा पुन्हा एकदा केलेला प्रयत्न आहे. आणि याआधीच्या अशा प्रयत्नांनी केलेले नुकसान आपण पाहिले आहेच. 'एक देश एक निवडणूक' ही संकल्पना गोंडस वाटत असली आणि स्वातंत्र्यानंतरची पहिली २० वर्षे राबवली गेलेली असली तरी आजच्या संदर्भात ती सहजसाध्य नाही. ती अमलात आणणे इतके सोपे नाही. त्यासाठी राज्यघटनेतील बदलांपासून विरोधकांच्या सामूहिक ऐक्यावर सहमती घडवून आणावी लागेल. भारतातील किमान १५ राज्यांच्या विधानसभेत या प्रस्तावाला मंजुरी घ्यावी लागेल. भारतीय राज्यघटनेमध्ये कलम ८३ (२) आणि १७२ (१) नुसार लोकसभा व विधानसभा यांचा कार्यकाळ पाच वर्षे निश्चित केलेला आहे. निवडणूक आयोगाला लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार दर पाच वर्षांनी निवडणूक घ्यावी लागते.




निवडणूक आयोगाने १९८३ साली एक देश एक निवडणूक सुरू व्हावी असे म्हटले होते. तर विधी आयोगानेही १९९९ साली तशी शिफारस केली होती. हे सारे पाहिले तर या मागणीत नवीन काहीही नाही. भारताला आज 'एक देश, एक निवडणूक' यापेक्षा निवडणूक सुधारणांची नितांत गरज आहे. सेंटर फॉर मीडिया स्टडीज (सीएमएस) या संस्थेने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीबाबतचा एक अहवाल जाहीर केला होता. त्यात म्हटले होते की, २०१९ मध्ये निवडणुकीवर अधिकृत खर्च साडेसहा हजार कोटी रुपये झाला होता. २०२४ च्या निवडणुकीत हा खर्च एक अब्ज कोटी होऊ शकतो. भाजपच्या सरकारने आणलेले निवडणूक रोखे धोरण हे तर बड्या माफिया भांडवलदारांना निवडणुकीत हस्तक्षेपाची पूर्णतः मुभा देणारे धोरण होते. त्यामुळे लोकशाही खऱ्या अर्थाने मजबूत करायची असेल तर निवडणूक पद्धत, निवडणूक सुधारणा यांकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. खरंतर अलीकडे निवडणुकांना येत असलेले स्वरूप पाहिले की निवडणूक सुधारणांची गरज स्पष्ट दिसते. कारण आज असलेल्या पद्धतीतील तरतुदी, कमतरता जाणवू लागल्या आहेत. लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार ही भारतीय एकात्मतेची प्रभावी शक्ती आहे. लोकशाही राज्य व्यवस्थेमध्ये निवडणूक हा एक महत्त्वाचा घटक आहे. निवडणूक पद्धती व प्रक्रिया यामधून लोकशाही जिवंत राहत असते. भारतीय समाज जीवनातील सर्वच म्हणजे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांत निवडणूक ही अपरिहार्य बाब बनलेली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ज्यांच्याकडे निजामकालीन नोंदी त्या मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र देणार!

## मुख्यमंत्री शिंदेंची घोषणा; पाच सदस्यांची समिती गठीत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मनोज जरांगे पाटील यांनी जी मागणी केली. त्यानुसार जे महसुली, निजामकालीन नोंदी ज्यांच्याकडे आहे. ज्यांच्याकडे महसुली शैक्षणिक इतर ज्या निजामकालीन नोंदी असतील. त्यांना कुणबी दाखले दिले जातील. अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. तर यासाठी आम्ही एक निवृत्त न्यायमूर्तींसह पाच सदस्यांची समिती गठीत केली आहे.**

आगामी महिन्याभरात ते त्यांचा अहवाल देतील. त्यानंतर पडताळणी करून सर्वांना कुणबी प्रमाणपत्र दिले जाईल, असेही ते म्हणाले. यासंदर्भातील जीआर लवकरच निघेल, असे त्यांनी स्पष्ट केले. एकनाथ शिंदे म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे.

ही आमची भूमिका आहे. त्यासाठी जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार कुणबी प्रमाणपत्रासाठी निवृत्त न्यायधीश संदीप शिंदे यांच्यासह पाच सदस्यीय समिती गठीत केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, इतर नोंदी निजामकालीन तपासणी, पडताळणी करणे त्याची एसओपी तयार करणे. त्यासाठी पूर्वीची कमिटी देखील मदत करेल. एक महिन्यात अहवाल सादर करेन. ज्यांच्या नोंदी आहेत त्यांना कुणबी दाखले मिळतील. संबंधित विभाग म्हणजे हैदराबाद येथील अधिकाऱ्यांशी संवाद साधतील. वैयक्तिक संवाद मुख्यमंत्र्यांशी साधला जाईल. त्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींची समिती गठीत केली जाईल. मनोज जरांगे पाटील यांना विनंती केली आहे.



यातून पूर्णपणे मार्ग काढूया यासाठी पूर्णपणे सरकार सकारात्मक आहे. सुप्रीम कोर्टात देखील केस लढण्यासाठी आम्ही तयार आहोत. सुप्रीम कोर्टात ज्या त्रुटी दाखवल्या आहेत. ते सादर करण्याचे काम हे सरकार करत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, हे सरकारचे धोरण आहे. त्यासाठी बैठका, चर्चा देखील झाल्या आहेत.

टीकणारे मराठा आरक्षण दिल्याशिवाय आमचं सरकार स्वस्त बसणार नाही, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. लाठीचार्ज संदर्भात संबंधित एसपीला सक्तीची रजा दिली. पोलिस महासंचालकांच्या माध्यमातून उच्चस्तरीय चौकशी केली आहे.

त्यासाठी आम्ही खंत व्यक्त केली आहे. मराठा समाजाच्या भावना, सन्मान राखणे हे सरकारचे काम आहे. आंदोलनाच्या आडून कोणीही राजकारण करू नये. या सगळ्यांनी एकत्र येवून सहकार्य करावे, असे आव्हान त्यांनी केली आहे.

निर्णय घेताना संपूर्ण परिणामाचा विचार केला जाईल. मनोज जरांगे यांच्या जीवाची काळजी आहे. मराठा समाजाला जे रद्द झालेले आरक्षण त्यांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्यामुळे त्यांनी आंदोलन मागे घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### जरांगे पाटलांकडून सहकार्याची अपेक्षा

» मनोज जरांगे पाटील यांना विनंती केली आहे. यातून पूर्णपणे मार्ग काढूया यासाठी पूर्णपणे सरकार सकारात्मक आहे. सुप्रीम कोर्टात देखील केस लढण्यासाठी आम्ही तयार आहोत. सुप्रीम कोर्टात ज्या त्रुटी दाखवल्या आहेत. ते सादर करण्याचे काम हे सरकार करत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, हे सरकारचे धोरण आहे. त्यासाठी बैठका, चर्चा देखील झाल्या आहेत. टीकणारे मराठा आरक्षण दिल्याशिवाय आमचं सरकार स्वस्त बसणार नाही, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

# मराठा आरक्षण देण्यासाठी अधिवेशन बोलवावे!

## सरकार मराठा ओबीसीमध्ये भांडणे लावतंय : वडेट्टीवार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य शासनाने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी अधिवेशन बोलवावे, ठराव घ्यावा. समाजाला आरक्षण देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवावा. केंद्राने बोलावलेल्या वन इंडिया वन नेशन अधिवेशन हे उपद्व्याप करणाऱ्यांनी यामध्ये मराठा समाजाला आरक्षण द्यावे. मला डिवचण्याचा कोणी प्रयत्न करू नये, विनाकारण मराठा व ओबीसी समाजामध्ये भांडण लावण्याचे काम राज्य सरकारने करू नये असा इशारा महाराष्ट्र राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सिंदखेडराजा येथे जनसंवाद यात्रेदरम्यान दिला.**

सिंदखेडराजा येथे आल्यानंतर राजमाता जिजाऊ यांचे दर्शन घेतले त्यानंतर पत्रकाराची संवाद साधला. विजय वडेट्टीवार म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात सरकार वेळकाढूपणा करीत आहे, हे चांगले नाही. अगोदरच्या राज्य सरकारमधील 28 मंत्र्यांपैकी सध्याच्या मंत्रिमंडळात त्यापैकी 18 मंत्री आहेत त्यांची जबाबदारी नाही का मराठा आरक्षण संदर्भात आवाज उठवण्याची? त्यावेळेस ते काय करीत होते? लाडू खात होते का? सत्तेचा मलिदा खात होते का? खुर्ची उबवत होते. नागपूरचा रिमोट कंट्रोल हे सर्व करून घेत आहे.

ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, असे वडेट्टीवार यावेळी म्हणाले. विजय वडेट्टीवार म्हणाले की, मराठा बांधवांवर झालेल्या लाठीमाराचा नेमका आदेश कोणी दिला यांची नार्को टेस्ट होणे गरजेचे आहे. राज्य शासनाने आता तत्काळ दुष्काळ घोषणा करून तसा निर्णय घ्यावा. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, असेही वडेट्टीवार यावेळी म्हणाले. भाजपविरोधात 'इंडिया'ने मोट बांधली आहे.



मुंबईत ज्या दिवशी ही बैठक झाली त्याच दिवशी जालन्यात मराठा आरक्षण चिघळवून लक्ष विचलित करण्याचा डाव आखला गेला, पण आता मराठा समाजासह ओबीसींमध्ये रोष वाढत आहे, त्यामुळे हा डाव भाजपच्याच अंगलट आला आहे.

काँग्रेसच्या वतीने सुरु असलेल्या जनसंवाद पदयात्रेनिमित्त नाना पटोले हे 6 सप्टेंबरला गडचिरोलीत आले होते. यावेळी शासकीय विश्रामगृहात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पटोले म्हणाले की, सध्या समाजात भीतीचे वातावरण व प्रचंड अस्वस्थता आहे.

तलाठी भरतीसाठी खासगी कंपनी नेमली आहे, त्याआडून लूट सुरु आहे. 2014 मध्ये भाजपने मराठा व धनगर समाजाला आरक्षणाचे आश्वासन दिले व लोकसभा व विधानसभा निवडणुकीत फायदा करुन घेतला, पण नंतर आरक्षणाचा प्रश्न सोडवला नाही. आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्यांपेक्षा अधिक वाढवावी व जातनिहाय जनगणना करावी, अशी काँग्रेसची भूमिका आहे.

### सरकारने सत्तेतून खाली उतरावे

» मराठा आंदोलकांवर केलेला लाठीमार हे राज्य सरकारने जाणीवपूर्वक केलेले पाप आहे. आरक्षण देताना कोणाच्याही तोंडचा घास हिरावून घेऊ नका व तणाव निर्माण करु नका. ओबीसी ही आग आहे, त्या आगीत हात टाकू नये एवढाच सरकारला आमचा सल्ला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी जातनिहाय जनगणना हाच मार्ग आहे. केंद्र सरकारने जातनिहाय जनगणा करावी सर्व समाज घटकांच्या आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो. भाजपाला आरक्षण देता येत नसेल तर त्यांनी केंद्र व राज्यातील सत्तेतून खाली उतरावे आम्ही मराठा समाजासह सर्व समाजाला न्याय देतो.' असं पटोले यावेळी म्हणाले.

# नवीन संसदेचा श्रीगणेशा!

## » 18 सप्टेंबरला विशेष अधिवेशनाचा पहिला दिवस

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**18 ते 22 सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनाचा पहिला दिवस जुन्या संसद भवनातील कामकाजाचा शेवटचा दिवस असेल. गणेश चतुर्थीच्या दिवशी 19 सप्टेंबर रोजी संसद नवीन इमारतीत हलवण्यात येणार आहे. 28 मे रोजी पंतप्रधान मोदींनी संसदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन केले. संसदेच्या नव्या इमारतीचे काम सुरू झाल्यानंतर जुन्या इमारतीचे 'लोकशाही संग्रहालय'मध्ये रूपांतर करण्यात येणार आहे.**

सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पांतर्गत बांधलेली नवीन संसद भवन हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. 973 कोटी रुपये खर्चून बांधलेली ही इमारत 29 महिन्यांत पूर्ण झाली आहे. 64 हजार 500 चौरस मीटरवर बांधलेली नवी संसद भवन 4 मजली आहे. त्याला 3 दरवाजे आहेत, त्यांना ज्ञान द्वार, शक्ती द्वार आणि कर्म द्वार अशी नावे आहेत. खासदार आणि व्हीआयपींसाठी स्वतंत्र प्रवेश आहे. नवीन इमारत जुन्या इमारतीपेक्षा 17 हजार चौरस मीटर मोठी आहे. संसदेच्या नव्या इमारतीला भूकंपाचा फटका बसणार नाही. त्याची रचना एचसीपी डिझाइन, प्लॅनिंग आणि मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडने तयार केली आहे. त्याचे शिल्पकार बिमल पटेल आहेत. सध्याचे संसद भवन 95 वर्षांपूर्वी 1927 मध्ये बांधण्यात आले होते. मार्च 2020 मध्ये, सरकारने संसदेत सांगितले की जुनी इमारत जास्त वापरण्यात आली होती आणि ती खराब होत आहे. यासोबतच लोकसभेच्या नव्या परिसीमनानंतर वाढणाऱ्या खासदारांना बसण्यासाठी जुन्या इमारतीत पुरेशी जागा नाही. यासाठी नवीन इमारत बांधण्यात येत आहे. संसदेची जुनी इमारत



४७ हजार ५०० चौरस मीटरमध्ये, तर नवीन इमारत ६४ हजार ५०० चौरस मीटरमध्ये बांधण्यात आली आहे. म्हणजेच नवीन इमारत जुन्या इमारतीपेक्षा 17 हजार चौरस मीटर मोठी आहे. नवीन संसद भवन चार मजली आहे. त्याला 3 दरवाजे आहेत, त्यांना ज्ञान द्वार, शक्ती द्वार आणि कर्म द्वार अशी नावे आहेत. खासदार आणि व्हीआयपींसाठी स्वतंत्र प्रवेश आहे. त्यावर भूकंपाचा परिणाम होणार नाही. त्याची रचना एचसीपी डिझाइन, प्लॅनिंग आणि मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडने तयार केली आहे. त्याचे शिल्पकार बिमल पटेल आहेत. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पांतर्गत राष्ट्रपती भवन ते इंडिया गेट या तीन किमी लांबीच्या रस्त्याचा पुनर्विकास करण्यात आला. गेल्या वर्षी 8 सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले होते. त्याच दिवशी त्यांनी राजपथचे नाव बदलून कर्तव्यपथ करण्याची घोषणा केली होती. नवीन इमारतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे संविधान सभागृह. या सभागृहात संविधानाची प्रत ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस आणि देशाच्या पंतप्रधानांचे मोठे फोटोही लावण्यात आले आहेत.



### भूकंपाचा परिणाम होणार नाही

» संसदेची जुनी इमारत ४७ हजार ५०० चौरस मीटरमध्ये, तर नवीन इमारत ६४ हजार ५०० चौरस मीटरमध्ये बांधण्यात आली आहे. म्हणजेच नवीन इमारत जुन्या इमारतीपेक्षा 17 हजार चौरस मीटर मोठी आहे. नवीन संसद भवन चार मजली आहे. त्याला 3 दरवाजे आहेत, त्यांना ज्ञान द्वार, शक्ती द्वार आणि कर्म द्वार अशी नावे आहेत. खासदार आणि व्हीआयपींसाठी स्वतंत्र प्रवेश आहे. त्यावर भूकंपाचा परिणाम होणार नाही. त्याची रचना एचसीपी डिझाइन, प्लॅनिंग आणि मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडने तयार केली आहे. त्याचे शिल्पकार बिमल पटेल आहेत.

# विशेष अधिवेशनापूर्वी सोनियांचे पंतप्रधानांना पत्र!

## » महागाई, चीन सीमा वादासह 9 मुद्द्यांवर चर्चेची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**18 सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या 12 दिवस आधी सोनिया गांधींनी पंतप्रधानांना पत्र लिहिले. ज्यामध्ये सोनियांनी 9 मुद्दे मांडले. महागाई, भारत-चीन सीमा विवाद आणि मणिपूर यासारख्या गंभीर विषयांवर सरकारने चर्चा करावी, अशी काँग्रेसची इच्छा आहे.काँग्रेस संसदीय पक्ष (CPP) अध्यक्ष सोनिया गांधी यांनी 24 पक्षांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हे पत्र पाठवले आहे.**

केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी गेल्या आठवड्यात संसदेच्या 18 ते 22 सप्टेंबर या पाच दिवसांच्या विशेष अधिवेशनाची माहिती दिली होती. मंगळवारी संध्याकाळी मल्लिकार्जुन खरगे यांच्या घरी भारतातील लोकसभा आणि राज्यसभा खासदारांची बैठक झाली. या बैठकीत निर्णय घेण्यात आला की I.N.D.I.A आघाडीमध्ये समाविष्ट असलेल्या 28 पक्षांपैकी 24 पक्ष 18 सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या विशेष अधिवेशनात सहभागी होतील. नेत्यांची भेट घेतल्यानंतर काँग्रेस अध्यक्ष खरगे म्हणाले- 'मोदी सरकार अजेंडा न सांगता पहिल्यांदाच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावत आहे. कोणत्याही विरोधी पक्षाशी सल्लामसलत किंवा माहिती देण्यात आली नाही. लोकशाही चालवण्याचा हा मार्ग नाही. मोदी सरकार दररोज प्रसारमाध्यमांमध्ये



संभाव्य अजेंड्याची कहाणी फिरवत असते आणि लोकांवर बोजा पडणाऱ्या मुद्द्यांवरून लक्ष हटवण्याचे निमित्त तयार करत असते. महागाई, बेरोजगारी, मणिपूर, चीनचे अतिक्रमण, कॅगचा अहवाल, घोटाळे या मुद्द्यांवरून लक्ष वळवून भाजपला लोकांची फसवणूक करायची आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात कोणतेही विधेयक मांडले जाणार नाही. तसेच संयुक्त अधिवेशनही बोलावले जाणार नाही. पाच दिवसांत ४-५ प्रस्ताव आणले जातील, त्यावर चर्चा करून आवाजी मतदानाने मंजूर केले जाईल. संसदीय कामकाज मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही सभागृहांच्या चर्चेसाठी विशेष सत्र बोलावण्यात आले आहे, त्यामुळे संयुक्त अधिवेशन होणार नाही. संयुक्त अधिवेशन झाले असते तर महिला आरक्षण विधेयक किंवा 'वन नेशन वन इलेक्शन'सारखे कोणतेही महत्त्वाचे प्रलंबित विधेयक मांडले जाण्याची शक्यता होती. सूत्रांचे म्हणणे आहे की G-20, चांद्रयान-3 चे यशस्वी लँडिंग, देशाची तिसरी आर्थिक शक्ती बनणे आणि इंडियाऐवजी भारताचा वापर करणे, सरकार एक प्रस्ताव मांडून चर्चेनंतर तो पास करू शकते. विधिमंडळात महिलांना ३३ टक्के आरक्षणाचे विधेयक मंजूर करण्यासाठी विशेष अधिवेशनाचे कोणतेही औचित्य नाही. हे विधेयक 2010 मध्ये राज्यसभेने मंजूर केले होते. एकमत नसल्याने ते लोकसभेत आणले गेले नाही. लोकसभेत सरकारचे बहुमत आहे, त्यामुळे विशेष अधिवेशनाची गरज नाही.

### एक देश एक निवडणुकीसाठी समिती

» देशात एकाच वेळी निवडणुका घेण्याची शक्यता पडताळून पाहण्यासाठी आणि शिफारशी करण्यासाठी केंद्र सरकारने अलीकडेच 2 सप्टेंबर रोजी आठ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. ज्याचे अध्यक्षस्थान माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद करत आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते अधीर रंजन चौधरी यांनी समितीत सहभागी होण्यास नकार दिला आहे. याशिवाय गृहमंत्री अमित शहा, राज्यसभेतील माजी विरोधी पक्षनेते गुलाम नबी आझाद, माजी वित्त आयोगाचे अध्यक्ष एनके सिंह, लोकसभेचे माजी सरचिटणीस सुभाष सी कश्यप, ज्येष्ठ वकील हरीश साळवे आणि माजी मुख्य दक्षता आयुक्त संजय कोठारी यांचा समावेश आहे.

# अनुष्काला कशाला बोलता ?

लोकप्रिय भारतीय दिग्दर्शकांमध्ये अनुराग कश्यप यांचे नाव घ्यावे लागेल. गेल्या तीन दशकांहून अधिक अनुराग यांनी वेगवेगळ्या धाटणीचे चित्रपट तयार केले. त्याला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. आपल्या आक्रमक भूमिकेमुळे आणि स्वभावामुळे अनुराग कश्यप हे नेहमची चर्चेत असतात. आता तर त्यांनी प्रसिद्ध अभिनेत्री अनुष्का शर्माची बाजू घेत विराट कोहलीला ट्रोल करणाऱ्यांना चांगलेच खडसावले आहे. यापूर्वी देखील अनुराग कश्यप हा त्याच्या प्रतिक्रियांमुळे चर्चेत आला आहे. त्यानं देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील अनेकदा आगपाखड केल्याचे दिसून आले होते. सेन्सॉर बोर्डावर देखील अनुरागनं आपला राग व्यक्त केला आहे. त्यानं त्यांना धारेवर धरत यामुळे कलाकाराच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला असल्याची प्रतिक्रिया दिली होती. यामुळे पुन्हा एकदा अनुराग हा वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. आता तो एका वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आला आहे. त्याचे कारण म्हणजे त्यानं अनुष्काला नेटकऱ्यांनी ज्या प्रतिक्रिया दिल्या होत्या त्यावरुन तो आक्रमक झाला आहे. लोकांना बोलायला काय जाते, ते काहीही विचार न करता बोलत राहतात. आता भारत विरुद्ध पाकिस्तानच्या सामन्यात विराट खेळला नाही म्हणून अनुष्काला शिव्या देण्यात किंवा तिला ट्रोल करण्यात काय आनंद मिळतो लोकांना माहिती नाही. अशा लोकांना आपण कितीही समजावून सांगितले तरी कळत नाही. ही एक वाईट प्रवृत्ती आहे अशी प्रतिक्रिया अनुरागनं दिली आहे. लोकं त्यालाच नावं ठेवतात जो नेहमीच यशस्वी होत असतो. ही टीका केवळ आता क्रिकेटपर्यंत राहिलेली नाही तर ती आता बॉलीवूडपर्यंत देखील आली आहे. लोकांना आपण काय बोलतो आहोत हे कळत नाही.



# ही बाई काहीही करु शकते

उर्फी जावेद हे मनोरंजन विश्वातील खुप चर्चेतलं नाव आहे. ती नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने लाईमलाईटमध्ये असते. तिने काही केले नाही तरी देखील तिच्या फॅशन आणि व्हिडिओमुळे तिची चर्चा होत असते. ती तिच्या वादग्रस्त वक्तव्य आणि फॅशनमुळे नेहमीच नेटकऱ्यांच्या निशाण्यावर असते. त्यातच आता पुन्हा उर्फीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. ज्यात तिने नेमकं काय परिधान केलं आहे? असा प्रश्न नेटकऱ्यांना पडला आहे. सध्या सोशल मीडियावर तिचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या ती काळ्या रंगाच्या आउटफिटमध्ये दिसत आहे. तिने तिच्या शरीराचा काही भाग काळ्या कपड्याने तर काही भाग काळ्या रंगाच्या जाळीने झाकला आहे. इतकंच नाही तर खूपच सैल पँट घालणाऱ्या उर्फीच्या या फॅशनची खुपच चर्चा रंगली आहे. तिचा हा लूक पाहिल्यानंतर नेटकरी तिच्या कल्पना शक्तीला दाद देत आहे. उर्फीला इतक्या भन्नाट कल्पना कशा सुचतात असे अनेक प्रश्न नेटकऱ्यांना पडले आहेत. तिच्या या व्हायरल होत असलेल्या व्हिडिओवर नेटकरी भन्नाट कमेंट करत आहे. एकानं लिहिलयं की, 'उड जा काले कावा' तर दुसऱ्याने लिहिलं की, "सर्व जग नष्ट होऊल मात्र उर्फीची फॅशन अजरामर होईल" तर एकानं लिहिलयं की, "अदनान सामीची 10 वर्षांपुर्वीची पँट तिने घातली आहे." तर दुसरीकडे उर्फीने इंस्टाग्रामवर एक तिचे काही फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये तिने तिची बोल्ड स्टाईल पुन्हा एकदा दाखवली आहे. या फोटोमध्ये उर्फीने मंकी कॅपने आपला चेहरा झाकला होता, मात्र ती टॉपलेस आहे.



# आपण भारतीय आहोत

देशाचे अधिकृत नाव इंडियावरून भारत असे बदलण्याच्या चर्चेदरम्यान, अभिनेत्री कंगना रनोटने या प्रस्तावाचे समर्थन केले आहे. सोशल मीडियावर पोस्ट करताना कंगनाने सांगितले की, तिने 2021 मध्ये भविष्य वर्तवले होते की, लवकरच देशाचे नाव बदलून इंडियावरून भारत केले जाईल. कंगनाने मंगळवारी ट्विटरवर तिच्या जुन्या मुलाखतीचा स्क्रीनशॉट शेअर केला, ज्यामध्ये तिने दोन वर्षांपूर्वी देशाचे नाव बदलण्याची इच्छा व्यक्त केली होती. ती म्हणाली होती- 'इंडिया हे नाव आपल्याला ब्रिटिशांकडून मिळाले आहे, त्यामुळे देशाचे नाव भारत असावे.' कंगनाने तिचे जुने ट्विट शेअर करताना सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी लिहिले- 'सर्वांचे अभिनंदन, आपण सर्वजण गुलामगिरीतून मुक्त झालो... जय भारत.' कंगनाने आणखी एका ट्विटमध्ये लिहिले- 'इंडिया' नावात प्रेम करण्यासारखे काय आहे? सर्वप्रथम त्यांना (परकीय आक्रमकांना) सिंधूचा उच्चार करता येत नव्हता, म्हणून त्यांनी 'सिंधू' किंवा 'हिंदू' असे नाव विकृत केले. महाभारत काळापासून कुरुक्षेत्राच्या महायुद्धात सहभागी झालेली सर्व राज्ये 'भारतीय खंड' म्हणून ओळखली जात होती. मग ते आम्हाला इंदू सिंधू का म्हणत होते? 'भारत हे नाव इतकं अचूक आहे, 'इंडिया'चा अर्थ काय? ते आम्हाला रेड इंडियन म्हणत, कारण जुन्या इंग्रजीत इंडियन म्हणजे गुलाम. त्यांनी आम्हाला भारतीय असे नाव दिले कारण हीच आमची नवीन ओळख होती, जी आम्हाला ब्रिटिशांनी दिली होती. जुन्या काळातील शब्दकोशातही इंडियन म्हणजे गुलाम असे म्हटले जात होते, परंतु आता ते बदलले आहे. हे आमचे नाव नाही, आम्ही भारतीय आहोत, इंडियन नाही. कंगनाने हे ट्विट अशा वेळी केले आहे जेव्हा देशाचे नाव बदलण्याची चर्चा जोरात सुरू आहे. वास्तविक, G20 ची बैठक 9 ते 10 सप्टेंबरदरम्यान दिल्लीतील प्रगती मैदानावर होणार आहे. या बैठकीच्या डिनरला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांसाठी राष्ट्रपती भवनातून निमंत्रण पत्रिका पाठवण्यात आली आहे. निमंत्रण पत्रिकेवर प्रेसिडेंट

# माझं पण नाव जॅकी

सध्या देशात INDIA VS BHARAT हा एक चर्चेचा मुद्दा झाला आहे. देशाचे एकच नाव असावे आणि ते नाव भारत असावे. या मुद्द्यावर आता बरेच वाद सुरु झालेले दिसत आहे. त्यात राजकारणापासून ते सर्व सामान्य लोकांपर्यंत सर्वांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यातच आता मनोरंजन विश्वातील कलाकरांनीही यावर प्रतिक्रिया देत आपलं मत स्पष्ट व्यक्त केले आहे. त्यातच यावर सर्वात आधी अमिताभ बच्चन यांनी प्रतिक्रिया दिली होती. त्यानंतर कंगना राणौत आणि साउथच्या अभिनेत्यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. आता त्यातच अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणी मीडियाशी बोलताना जॅकी श्रॉफ म्हणाले की, "जर भारताला भारत म्हटलं जात असेल तर यात काय वाईट गोष्ट नाही . इंडिया हा इंडिया आहे, भारत हा भारत आहे. आता माझं नाव जॅकी आहे पण काहीजण मला जॉकी म्हणतात आणि काही मला जैकी म्हणतात. त्यांनी माझे नाव खूप तोडलयं पण मी माझं नाव नाही बदलणार.



# शाहरुख खानने केला भन्नाट रिप्लाय!

शाहरुख खानच्या जवान सिनेमाची सध्या सर्वांना उत्सुकता आहे. जवान रिलीज व्हायला अवघे काही तास बाकी आहेत. शाहरुखचा जवान पाहण्यासाठी मध्यरात्रीपासुन रांगा लागल्या आहेत.जवान पाहण्यासाठी लहानांपासुन मोठ्यांपर्यंत सगळे उत्सुक आहेत. अशातच बॉलिवूड सेलिब्रिटी सुद्धा जवानला शुभेच्छा देत आहेत. महेश बाबू यांनी ट्विट केले- आता जवानची वेळ आली आहे. शाहरुख खानची संपूर्ण ताकद ट्रेलरमधुन दिसतंय. संपूर्ण भारतात सिनेमा ब्लॉकबस्टर होण्यासाठी मी संपूर्ण टीमला शुभेच्छा देतो. माझ्या संपूर्ण कुटुंबासह चित्रपट पाहण्यास उत्सुक आहे. महेश बाबूचे ट्विट शेअर करताना शाहरुख खानने लिहिले - मित्रा, तुमचे खूप खूप आभार. मला आशा आहे की तुम्हाला चित्रपट आवडेल. तुम्ही जेव्हा सिनेमा पाहायला जाल तेव्हा मला कळवा आणि मी येईन आणि तुझ्याबरोबर बघेन. तुमच्यावर आणि तुमच्या कुटुंबावर प्रेम आहे. मोठ्ठी मिठी. शाहरुख खानचे हे ट्विट व्हायरल होत आहे, महेश बाबूच्या चाहत्यांना ते खूप आवडले आहे. त्यात आता ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांनी देखील शाहरुख खानच्या जवानसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. हि-मॅनने किंग खानसोबतचा एक थ्रोबॅक फोटो शेअर केला आहे. यात त्यांनी लिहिले की, "शाहरुख मुला तूला जवानसाठी अनेक शुभेच्छा." शुभेच्छा त्यांनी शाहरुखवर प्रेमाचा वर्षाव केला आहे.

# अफगाणची झुंज व्यर्थ!

## » श्रीलंकेने दोन गडी राखून सामना जिंकला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**गतविजेत्या श्रीलंकेने आशिया कप 2023 च्या सुपर-4 मध्ये प्रवेश केला आहे. अत्यंत रोमहर्षक सामन्यात या संघाने अफगाणिस्तानचा 2 धावांनी पराभव केला. लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळवण्यात आलेला शेवटचा साखळी सामना ३७.१ षटकात जिंकून अफगाणिस्तानला सुपर-४ मध्ये प्रवेश करण्याची संधी होती, पण श्रीलंकेने ३८व्या षटकात दोन गडी राखून सामना जिंकला.**

सामन्यादरम्यान अनेक मनोरंजक क्षण पाहायला मिळाले. लंकन डावाच्या 39व्या षटकात राशिद खानने फॉलो-थ्रूमध्ये शनाकाचा झेल सोडला. रशीदच्या हातातून चेंडू निसटला आणि नॉन-स्ट्राइक स्टंपवर गेला आणि 92 धावांवर खेळत असलेला कुसल मेंडिस धावबाद झाला. सुपर-4 साठी पात्र ठरण्यासाठी अफगाणिस्तानला 37.1 षटकात 292 धावांचे लक्ष्य गाठावे लागले. एकावेळी संघाला एका चेंडूत 3 धावा करायच्या होत्या. तेव्हा धावसंख्या 37 षटकांत 289/8 होती. राशिद खान (27 धावा) सोबत मुजीब उर रहमान (0 धावा) नाबाद होते. येथे मुजीब धावा काढेल असे वाटत होते, पण 38व्या षटकात आलेल्या धनंजय डी सिल्वाने मुजीबला समरविक्रमाकडून झेलबाद केले. येथे अफगाणिस्तानने 9वी विकेट गमावली. फजल हक फारुकी शेवटची विकेट म्हणून खेळायला आला.

आता अफगाणिस्तानला आणखी 3 चेंडूत चौकारांच्या सहाय्याने 295 धावा करून पात्र ठरण्याची संधी होती, परंतु फारुकीने दोन बॉल डॉट्स खेळले आणि तिसऱ्यावर एलबीडब्ल्यू झाला. अफगाणिस्तान नऊ विकेट्स गमावूनही पात्र ठरू शकले असते, असे नंतर सांगण्यात आले, परंतु संघ व्यवस्थापनाला याची माहिती नव्हती. 37.1 षटकानंतरही, अफगाण संघाने पुढील 4 चेंडूत चौकारांच्या मदतीने 295 धावा केल्या असत्या तर ते सुपर-4 साठी पात्र ठरले असते. पण हे होऊ शकले नाही. सामना 2 धावांनी गमावल्यानंतर अफगाणिस्तानचा अष्टपैलू आणि अनुभवी फिरकी गोलंदाज राशिद खान निराश होऊन खेळपट्टीवर बसला. त्याने १६ चेंडूंत चार चौकार आणि एका षटकारासह २७ धावांची खेळी केली, पण तो आपल्या संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.



### विरोधी संघाला ऑलआउट केले

» श्रीलंकेचा संघ अफगाणिस्तानला 37.4 षटकांत 289 धावांत ऑलआउट केले. संघाने सलग 12व्या एकदिवसीय सामन्यात विरोधी संघाला ऑलआउट केले आहे. यासह संघाने स्वतःचा विक्रम सुधारला. श्रीलंकेपूर्वी ऑस्ट्रेलियन संघाने सलग 10 सामन्यात विरोधी संघाला ऑलआऊट केले होते.

श्रीलंकेच्या डावातील 40व्या षटकातील पहिल्या चेंडूवर राशिद खानने फॉलो-थ्रूवर श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाचा झेल चुकवला, मात्र 92 धावांवर खेळणारा कुसल मेंडिस धावबाद झाला. वास्तविक, राशिदच्या हातातून चेंडू निसटला आणि खेळपट्टीवर पडला आणि नॉन-स्ट्रायकर एंडच्या स्टंपला लागला. त्यानंतर नॉन स्ट्रायकर कुसल मेंडिस क्रीजबाहेर असल्याने त्याला पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले. अफगाणिस्तानच्या गुलबदिन नायबने 15 व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर श्रीलंकेचा सलामीवीर पथुम निसांकाची विकेट घेतली. निसांका 41 धावा करून बाद झाला. एनएबीने त्याला नजीबुल्ला झद्रानच्या हाती झेलबाद केले.. निसांकाची विकेट घेतल्यानंतर नायबने आपले मसल्स दाखवून आनंद साजरा केला. मोहम्मद नबीने 32 चेंडूत 65 धावांची अर्धशतकी खेळी खेळली. त्याने 24 चेंडूत अर्धशतक झळकावले. यासह नबी अफगाणिस्तानसाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला. त्याने 26 चेंडूत अर्धशतक झळकावण्याचा मुजीब उर रहमानचा विक्रम मागे टाकला. श्रीलंकेचा संघ अफगाणिस्तानला 37.4 षटकांत 289 धावांत ऑलआउट केले.

# जोकोविच यूएस ओपनच्या उपांत्य फेरीत!

## » गॉफचाही अंतिम-4मध्ये प्रवेश केला; बोपण्णाची पुरुष दुहेरीत बाजी

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोव्हाक जोकोविच आणि अमेरिकेचा युवा खेळाडू कोको गॉफ यांनी यूएस ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. दुसरीकडे, पुरुष दुहेरीत भारतीय खेळाडू रोहन बोपण्णाने ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅमी एबडेनसह उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.**



### जोकोविचने केला फ्रिट्झचा पराभव

» नोव्हाक जोकोविचने पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत टेलर फ्रिट्झचा पराभव केला. जोकोविचने 47 व्या वेळी ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. यासोबतच त्याने यूएस ओपनमध्ये 13व्यांदा सेमिफायनल गाठली आहे. जोकोविच 17व्यांदा यूएस ओपनमध्ये खेळत आहे.

नोव्हाक जोकोविचने पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत टेलर फ्रिट्झचा पराभव केला. जोकोविचने 47 व्या वेळी ग्रँडस्लॅम स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. यासोबतच त्याने यूएस ओपनमध्ये 13व्यांदा सेमिफायनल गाठली आहे. जोकोविच 17व्यांदा यूएस ओपनमध्ये खेळत आहे.जोकोविचने टेलर फ्रिट्झचा 6-1, 6-4, 6-4 असा पराभव केला. तीन वेळा यूएस ओपन विजेत्या जोकोविचचा उपांत्य फेरीत सामना अमेरिकन खेळाडू बेन शेल्टनशी होणार आहे. शेल्टन पहिल्यांदाच एखाद्या ग्रँडस्लॅमच्या उपांत्य फेरीत पोहोचला आहे. शेल्टनने उपांत्यपूर्व फेरीत ह्वाटन फ्रान्सिस टियाफोचा पराभव केला. गॉफने जागतिक क्रमवारीत अव्वल ओस्टापेन्कोचा केला पराभव कोको गॉफने मंगळवारी रात्री उशिरा खेळल्या गेलेल्या महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत 2017 फ्रेंच ओपन विजेती जेलेना ओस्टापेन्कोचा सरळ सेटमध्ये पराभव केला. गॉफने ओस्टापेन्कोचा 6-0, 6-2 असा पराभव करत पहिल्यांदाच यूएस ओपनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. ओस्टापेन्कोने प्री-क्वार्टर फायनलमध्ये गतविजेत्या इगा स्वितेकचा पराभव करून प्रथमच यूएस ओपनची उपांत्यपूर्व फेरी गाठली. भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेन पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. त्यांच्या जोडीने उपांत्यपूर्व फेरीत नॅथॅनियल लॅमन्स आणि जॅक्सन विथ्रो या अमेरिकन जोडीचा 7-6(10), 6-1 असा पराभव केला. याआधी त्यांनी प्री-क्वार्टर फायनलमध्ये ज्युलियन कॅश आणि हेन्री पॅटन या जोडीचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान पक्के केले होते. बोपण्णा आणि एबडेन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला विम्बल्डनची उपांत्य फेरी गाठली होती.

